# दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM)
## राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष,
## नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई.

---

नगरविकास विभाग शासन निर्णय दि. २८ ऑगस्ट २०१४ व दि. १२ मे २०१७ अन्वये DAY-NULM योजनेची अंमलबजावणी राज्यातील २५९ शहरांमध्ये तसेच शासन निर्णय दि. २७ जुलै २०२३ अन्वये उर्वरित १५५ शहरांमध्ये म्हणजेच एकूण ४१४ शहरांमध्ये (महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायत) करण्यात येत आहे.(नव्याने निर्माण शहरांसह ४२४)

सद्यस्थितीतील NULM अभियानास गृह निर्माण व शहरी कार्य मंत्रालय (MoHUA) यांच्यामार्फत देण्यात आलेली मुदतवाढ दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी संपुष्टात आली असून सदर अभियान माहे सप्टेंबर २०२४ रोजी समाप्त करण्यात आले आहे. या अभियानाचे रुपांतर "दीनदयाळ जन आजीविका योजना" (शहरी) (DJAY(S)) मध्ये करण्यात आले आहे.

गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली यांच्याकडून पथदर्शी (Pilot) स्वरूपात "दीनदयाळ जन आजीविका योजना" (शहरी) (DJAY(S)) या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक ०४.१२.२०२४ रोजी सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार पथदर्शी स्वरुपात कामकाज सुरु करून शहर निहाय शहर उपजीविका कृती आराखडा (City Livelihood Action Plan (C-LAP)) तयार करण्याबाबत सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

➢ DAY-NULM मुख्य उद्दिष्टे:

- नागरी गरीब लोक, त्यांच्या संस्थांची क्षमता बांधणी करणे, उपजीविकेचा विकास व नागरी दारिद्र निर्मुलन करणारी यंत्रणा यांची क्षमता वाढविणे,
- नागरी गरीब कुंटुंबातील व्यक्तींना उपजविकेच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देणे,
- बाजाराच्या औद्योगिक गरजेनुसार व आवश्यकतेनुसार, विविध क्षेत्रांच्या गरजा लक्षात घेउन नागरी गरीब व्यक्तींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देउन त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे.
- नागरी गरीबांच्या लघुउद्योगांना चालना देणे.
- नागरी बेघर लोकांसाठी कायमस्वरूपी व मूलभूत सोयी सुविधा असलेल्या निवाऱ्याची सोय करणे.
- नागरी फेरीवाल्यांच्या उपजविकेच्या समस्या सोडून त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.

➢ DAY-NULM लाभार्थी निकष:

- दि. २८ ऑगस्ट २०१४ च्या शासन निर्णयानुसार राज्यामध्ये २५९ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अभियानाच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली असून यामध्ये २८ महानगरपालिका व २३१ नगरपालिका यांचा समावेश आहे.

- लाभार्थी निश्चिती (शासन निर्णय दि. ०२ ऑगस्ट २०१६): शहरी गरीब म्हणून सामाजिक आर्थिक जातनिहाय सर्वेक्षण (SECC) २०११ च्या यादीच्या आधारे लाभार्थी निश्चिती करण्यात येतात. (शहरी गरीब ७५% व उर्वरित २५% -SCs, STs, Women, Minorities, Disabled etc.) (SMID घटकासाठी ७०% व ३०% प्रमाण आहे.)
- धोकादायक व स्वच्छता क्षेत्रातील अतीजोखमीचे काम करणारे व्यक्ती हे शहरी गरीब समजण्यात येऊन त्यांना अभियानाचा लाभ देण्यात येतो.
    ०. भिकारी
    १. चिंधी वेचणारे
    २. घर कामगार
    ३. रस्त्यावरील विक्रेता /चर्मकार/फेरीवाला/रस्त्यावर काम करून अन्य सेवा पुरविणारे.
    ४. बांधकाम कामगार/नळ कारागीर/गवंडी/मजूर/रंगारी/सुरक्षा रक्षक हमाल/अन्य माथाडी कामगार
    ५. सफाई कामगार/स्वच्छता कामगार/माळी
    ६. गृह उद्योग-कामगार/कलाकार/हस्त व्यवसाय कामगार शिंपी
    ७. वाहतूक कामगार/चालक/वाहक/चालकाचा वाहकाचा मदतनीस/गाडीवान रिक्षा चालक.

## ➢ DAY-NULM अभियानांतर्गत समिती:

नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. एनयुएल-२०१४/प्र.क्र.१०४/नवि ३३ दि. २८ नोव्हेंबर २०१४ अन्वये अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे विविध समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

1. राज्य नियामक मंडळ (अध्यक्ष-मा. मुख्यमंत्री)
2. राज्यस्तरीय कार्यकारी समिती (अध्यक्ष-मा. मुख्य सचिव)
3. राज्यस्तरीय व्यवस्थापन समिती (अध्यक्ष-मा. प्रधान सचिव, नवि-२)
4. राज्य छाननी व निवड समिती (अध्यक्ष-मा. राज्य अभियान संचालक)
5. राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समिती (अध्यक्ष-मा. प्रधान सचिव, नवि-२; प्राधिकृत-मा. राज्य अभियान संचालक)

## ➢ DAY-NULM अभियानातील घटक:

### १. सामाजिक अभिसरण व संस्थात्मक विकास

**Social mobilisation and Institution Development (SMID)**

- सदर घटकांतर्गत स्वयंसहाय्यता बचत गटाची स्थापना करण्यात येते. बचत गटांची ३ महिन्यानंतर प्रतवारी करून रु. १०,०००/- फिरता निधी दिला जातो.
- १० ते २० बचत गट मिळून एक वस्ती स्तर संघ स्थापन करण्यात येतो,यामध्ये प्रत्येक गटातून १ सदस्य निवडला जातो. वस्ती सत्र संघाची ६ महिन्यानंतर प्रतवारी करून रु. ५०,०००/- फिरता निधी दिला जातो.

- शहर स्तरावरील सर्व वस्ती स्तर संघ एकत्रित येऊन त्यातील सदस्यातून एक शहर स्तर संघ स्थापन करण्यात येतो.
- शहर स्तर संघाअंतर्गतच शहरी उपजीविका केंद्र स्थापन करण्यात येते.
- शहर स्तर संघांमार्फत शहरातील नागरिकांच्या गरजेनुसार विविध सेवा पुरविणे, रोजगार संधी उपलब्ध करून देणे, उद्योग व्यवसायाचे मार्गदर्शन करणे, विविध प्रशिक्षण आयोजित करणे, शासकीय योजनांची माहिती देणे, पत पुरवठ्यास मदत करणे, गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे इत्यादी सेवा पुरविल्या जातात.

## २. कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगाराची उपलब्धता

**Employment through Skill Training and Placement (EST&P)**

- सदर घटकांतर्गत लाभार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करण्याकरिता बाजारातील कौशल्याच्या गरजेनुसार आवश्यक कौशल्य विकास प्रशिक्षण मान्यताप्राप्त संस्थेकडून उपलब्ध करून दिले जाते. यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी हि अग्रणी संस्था म्हणून कार्यरत होती. सध्यस्थितीत सदर कौशल्य प्रशिक्षण राज्य अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत देण्यात येते.

## ३. स्वयंरोजगार कार्यक्रम

**Self-Employment Programme (SEP)**

- सदर घटकांतर्गत वैयक्तिकलाभार्थ्यांना रुपये २ लक्ष पर्यंत व स्वयंसहाय्यता बचत गटांना रुपये १० लक्ष पर्यंत बँकांमार्फत व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यात येते.
- लाभार्थ्यांना ७% वरील कर्जावर व्याज अनुदान (Interest Subvention) उपलब्ध करून दिले जाते. महिला बचत गटांनी विहित कालावधीत कर्जाची परतफेड केल्यास त्यांना प्रोत्साहन म्हणून व्याजदरातील रकमेत ३% अतिरीक्त व्याज परतावा देण्यात येतो.

## ४. नागरी फेरीवाल्यांना सहाय्य

**Support to Urban Street Vendor (SUSV)**

- सदर घटकांतर्गत पथविक्रेता सर्वेक्षण, शहर पथविक्रेता आराखडा व पथविक्रेता बाजारपेठ यांना पायाभूत सुविधा पुरविणे यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निधीची तरतूद आहे.

## ५. नागरी बेघरांना निवारा

**Shelter for Urban Homeless (SUH)**

- NULM मार्गदर्शक सूचनानुसार सदर घटक १ लाख पेक्षा जास्त लोकसंख्या व जिल्हा मुख्यालय अशा ५४ शहरात राबविण्यात येत आहे.

- सदर घटकांतर्गत नागरी बेघरांचे सर्वेक्षण करणे तसेच नागरी बेघरांना सर्व सोई-सुविधायुक्त निवारा उपलब्ध करून देण्याचे काम केले जाते.

### ६. क्षमता बांधणी आणि प्रशिक्षण

**Capacity Building and Training (CBT)**

- अभियानांतर्गत राज्य स्तरावर ६ राज्य अभियान व्यवस्थापक यांची पदे मंजुर आहेत, तर शहर स्तरावर २२८ शहर अभियान व्यवस्थापक, १६० सहाय्यक प्रकल्प अधिकारी व ५८२ समुदाय संघटकांची पदे कंत्राटी तत्वावर मंजूर आहेत.
- सदर राज्य अभियान व्यवस्थापक, शहर अभियान व्यवस्थापक, सहाय्यक प्रकल्प अधिकारी व समुदाय संघटक यांच्यामार्फत अभियानातील सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी (SM&ID), कौशल्याद्वारे रोजगाराची उपलब्धता (EST&P), स्वयंरोजगार कार्यक्रम (SEP), नागरी फेरीवाल्यांना सहाय्य (SUSV) व नागरी बेघरांसाठी निवारा (SUH) या उपांगांची प्रत्यक्षात अंमलबजावणी केली जाते. तसेच PMSVANidhi व PMFME योजनेची अंमलबजावणी सुद्धा NULM अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यामार्फत केली जात आहे.

## नवीन पथदर्शी योजना :

### दीनदयाळ जन आजीविका योजना-शहरी (Deendayal Jan Aajivika Yojana- Sheheri (DJAY-S)

- शहरी गरिब व धोकादायक क्षेत्रामधील व्यक्तींसाठी - स्थानिक स्तरावरील समुदाय संस्थांचे बळकटीकरण करणे, रोजगाराच्या संधी निर्माण करणे, सामाजिक पायाभूत सुविधा निर्माण करणे तसेच त्यांना आर्थिक व सामाजिक सुरक्षा प्रदान करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.
- दि. ०१ ऑक्टोबर २०२४ पासून पथदर्शी स्वरूपामध्ये योजनेची अंमलबजावणी करण्यास सुरुवात करण्यात आली.
- योजनेंतर्गत महत्वाचे घटक
    १. समुदाय संचालित संस्थात्मक विकास (Community Led Institutional Development-CLED)
    २. वित्तीय समावेशन व व्यवसाय विकास (Financial Inclusion & Enterprise Development-FI&ED)
    ३. नाविन्यपूर्ण व विशिष्ट प्रकल्प (Innovative & Special Project-I&SP)
    ४. सामाजिक पायाभूत सुविधा (Social Infrastructure-SI)
    ५. कृतीसंगम (Convergence)
    ६. क्षमता बांधणी व प्रशिक्षणे (Capacity Building & Training-CB&T)
- लाभार्थी म्हणून NFSA नुसार PHH & AYY नोंदणीकृत कुटुंबाव्यतिरिक्त प्राधान्य देण्यात येणारे घटक:
    १. बांधकाम कामगार (Construction workers)
    २. घरकाम कामगार (Domestic Workers)
    ३. वाहतूक कामगार (Transportation workers)
    ४. गिग कामगार (Gig Workers)
    ५. व्यक्तिगत सेवा कामगार (Care Workers)
    ६. स्वच्छता कामगार (Waste workers)
- DJAY अंतर्गत कार्यवाही :
- DAJAY अंतर्गत शहर उपजीविका कृती आराखडा (CLAP) तयार करणे बाबत निर्देश आहेत.
- MoHUA यांच्या प्रतिनिधीच्या माध्यमातून ToT घेण्यात आले.
- विभागीय स्तरावर CLAP नोडल अधिकारी यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.
- राज्यातील ३६१ शहरांमध्ये CLAP करिता शहर उपजीविका कामकाज समिती (CLTF) स्थापन करण्यात आली असून, समितीच्या माध्यमातून CLAP बनविण्याची प्रक्रिया चालू आहे.

- उपरोक्त व्यतिरिक्त स्वयंसहाय्यता बचत गटांची स्थापना, वैयक्तिक कर्ज, बचतगट कर्ज, शहर उपजीविका केंद्र कामकाज या उपक्रमांची अंमलबजावणी चालू आहे.
- दीनदयाळ जन आजीविका योजना शहरी याचा शासन निर्णय निर्गमित करणे साठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.
- PMSVANidhi व स्वनिधी से समृद्धी अंतर्गत शिबिरे आयोजित करणे व इतर कामकाज, PMFME, PM Vishwakarma इत्यादी योजनांची अंमलबजावणी तसेच ULB मधील महिला बालकल्याण, दिव्यांग विभागाचे कामकाज करण्यात येत आहे.
- DJAY अंतर्गत दि. ०१/१०/२०२४ पासून आजपावेतो करण्यात आलेले कामकाज खालीलप्रमाणे :

## ➢ प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना (PMFME):

- DAY-NULM अभियानांतर्गत MoHUA यांच्या दिनांक २१ जुन २०२१ रोजीच्या सुचनांच्या आधारे राज्यामध्ये प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना राज्यातील २५९ शहरात राबविण्यात येत आहे.
- या योजनेंतर्गत बीज भांडवल या घटकासाठी केंद्रीय खाद्य प्रसंस्करण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, कृषि आयुक्तालय, पुणे, तसेच DAYNULM-MoHUA यांनी वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
- सदर योजनेंतर्गत नागरी भागातील सुक्ष्म अन्न प्रक्रीयेमध्ये कार्यरत असलेल्या उद्योजक बचत गटांना बीज भांडवल उपलब्ध करून देण्यात येते.
- सदर योजनेंतर्गत नागरी भागातील सुक्ष्म अन्न प्रक्रीयेमध्ये कार्यरत असलेल्या उद्योजक बचत गटांना रु. ४ लाख पर्यंत (प्रति व्यक्ती रु. ४०,०००/- पर्यंत) बीज भांडवल उपलब्ध करून देण्यात येते.
- या योजनेच्या माध्यमातून आजतागायत एकूण १९४५ बचत गटांना ५५.१८ कोटी बीज भांडवल उपलब्ध करून देण्यात आले आहे.
- PMFME अंतर्गत Credit Linked Subsidy घटकामध्ये सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगासाठी वैयक्तिक तसेच बचत गटांना ३५% अनुदान आधारित कर्ज दिले जाते. अनुदान रक्कम कमाल रु.१० लाख असून, सदर प्रस्ताव बँकेकडे सादर करण्यासाठी संसाधन व्यक्ती (DRP) यांची नेमणूक करण्यात आली आहे.

## ➢ प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (PMSVANidhi) योजना:

- कोविड -१९ कालावधीत टाळेबंदीमध्ये (Lockdown) पथविक्रेत्यांच्या उपजिविकेवर विपरित परिणाम झाला आहे. अशा पथविक्रेत्यांना त्यांचा व्यवसाय पुन्हा सुरू करण्यासाठी खेळते भांडवलाचा पतपुरवठा तातडीने प्रदान करण्यासाठी पीएमस्वनिधी योजना अंमलात आली आहे. राज्यात पीएमस्वनिधी योजनेची दि. १७ जून २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये अंलबजावणी करण्यात येत आहे. **सदर योजनेला डिसेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती, सध्या सदर योजना नवीन लाभार्थ्यांसाठी बंद असून, डिसेंबर २०२४ अखेर बँकांकडे मंजूर असलेले प्रकरणे वितरण करण्याच्या सूचना आहेत.**
- सदर योजना ही एक केंद्र पुरुस्कृत योजना आहे. गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाद्वारे (MoHUA) संपूर्णपणे अर्थसहाय्य असलेल्या योजनेचे पुढीलप्रमाणे उद्दीष्टे आहेत:
    १. कर्जाचा पहिला हप्ता रु. १०,०००/-; कर्जाचा दुसरा हप्ता रु. २०,०००/- आणि कर्जाचा तिसरा हप्ता रु. ५०,०००/- पर्यंतचे खेळते भांडवली कर्ज उपलब्धतेसाठी सुलभीकरण करणे.
    २. नियमित परतफेड करण्यासाठी प्रोत्साहन देणे; आणि
    ३. डिजिटल व्यवहारास प्रोत्साहन देणे : ५,५६,४३४ पथ विक्रेत्यांना डिजिटली सक्रीय करण्यात आले आहे.
    ४. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना ७% व्याज अनुदान देण्यात येते.

| कर्ज टप्पा | उद्दिष्ट | उद्दिष्ट पूर्तता | % |
|---|---|---|---|
| प्रथम रु.१००००/- | ९२४००० | ८५२५२२ | ९२% |
| द्वितीय रु.२००००/- | १६४४५० | २०१४५७ | १२२% |
| तृतीय रु.५००००/- | १९२७० | ३२१२३ | १६७% |

## ➢ स्वनिधी से समृद्धी:

- PMSVANidhi योजनेस जोडून केंद्र सरकारने स्वनिधी से समृध्दी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.
- PMSVANidhi योजेनेच्या सर्व लाभार्थ्यांचे सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण करून केंद्र शासनाच्या ८ योजनांसाठी त्यांची व त्यांच्या कुटुंबियांची पात्रता तपासणे व पात्रतेनुसार सदर योजनांचा लाभ देण्याबाबत सूचित केलेले आहे. यामध्ये खालील ८ योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

  I. वित्त विभाग/ राज्यस्तरीय बँकर्स समिती:

१. प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना.
२. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना.
३. प्रधानमंत्री जन-धन योजना व रुपे कार्ड.

II. कामगार विभाग :

४. इमारत व इतर बांधकाम अंतर्गत नोंदणीकरण.
५. प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना.

III. अन्न नागरी पुरवठा विभाग:

६. एक राष्ट्र एक राशन कार्ड.

IV. आरोग्य विभाग:

७. जननी सुरक्षा योजना.

V. महिला व बालकल्याण विभाग:

८. प्रधानमंत्री मातृ वंदना योजना.

| **Sr. No.** | **Schemes** | **Eligible** | **Applied** | **Sanctioned** | **%** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | PM Suraksha Bima Yojana | 8,54,275 | 6,30,686 | 5,89,014 | 69 |
| 2 | PM Jeevan Jyoti Bima Yojana | 6,20,492 | 4,68,654 | 4,29,474 | 69 |
| 3 | PM Shram Yogi Maandhan Yojana | 2,06,280 | 76,588 | 30,599 | 15 |
| 4 | PM Jan Dhan Yojana | 1,32,830 | 85,757 | 73,493 | 55 |
| 5 | One Nation One Ration Card | 76,381 | 65,088 | 57,267 | 75 |
| 6 | Registration under BoCW | 4,965 | 2,639 | 1,368 | 28 |
| 7 | Janani Suraksha Yojana | 4,932 | 2,345 | 1,749 | 35 |
| 8 | PM Matru Vandana Yojana | 633 | 291 | 218 | 34 |
| **Total:** | | **19,00,788** | **13,32,048** | **11,83,182** | **62** |

➢ विशिष्ट कामकाज:

- बेघर निवारा लोगोचे अनावरण :
    - दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत नागरी बेघरांसाठी निवारा (Shelter for Urban Homeless) उपक्रम राबविण्यात येतो. या बेघर निवाऱ्यासंबंधी सामान्य नागरिकांना माहिती होणे आवश्यक आहे. विविध सामाजिक उपक्रमांसाठी लोगो वापरले जातात त्याच धर्तीवर बेघर निवाऱ्यासाठी लोगो तयार करण्यात आला आहे. सदर लोगो (Signage) राज्यातील सर्व निवारा केंद्रे त्याचप्रमाणे नागरी बेघरांसाठी निवाऱ्याबाबत असणारी पत्रके, बॅनर्स इत्यादी साहित्यांवर वेगवेगळ्या ठिकाणी वापरण्यात येणार आहे. तसेच या लोगोमुळे बेघर निवारा डिजिटल माध्यमांचा वापर करून शोधणे सोपे होईल, तसेच लोगो हा दिशा दर्शकाचे काम करेल.
    - सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे स्थापन झालेल्या राज्यस्तरीय नागरी बेघर निवारा सनियंत्रण समितीच्या मार्गदर्शनाखाली जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्स कडून हा लोगो बनवून घेण्यात आला आहे. नगर विकास दिनाचे औचित्य साधून या लोगोचे अनावरण करण्यात आले आहे.

- लाभार्थी यशोगाथा - कॉफी टेबल बुक चे प्रकाशन:
    - शहरी गरिबांसाठी हे अभियान राबविले जात आहे. यामध्ये केंद्र शासन व राज्य शासन यांचा ६०:४० या प्रमाणात निधी उपलब्ध होतो. अभियानांतर्गत विविध घटकांच्या माध्यमातून महिला बचतगट तयार करणे त्यांना प्रशिक्षण देणे, कर्ज उपलब्ध करून देणे, बेघर निवारा तयार करणे व त्यांचे व्यावस्थापन करणे, कौशल्य प्रशिक्षण देणे, पथविक्रेत्यांना सहाय्य करणे इत्यादी उपक्रम राबविले जातात.
    - या उपक्रमांमधील चांगले काम यशोगाथांच्या स्वरूपात या कॉफी टेबल बुकच्या माध्यमातून (इंग्रजी व मराठी) तयार करण्यात आले आहे. नगर विकास दिनाचे औचित्य साधून या कॉफी टेबल बुक चे प्रकाशन करण्यात आले आहे.

- लाभार्थी यशोगाथा चित्रफित संचाचे प्रकाशन:
    - अभियानांतर्गत ५२ शहरातील चांगल्या कामाचे चित्रण अशा ५२ चित्रफिती तयार करण्यात येत आहेत.
    - त्यापैकी प्रथम सहा (ठाणे, कल्याण डोंबिवली, खोपोली, सावंतवाडी, रत्नागिरी, चिपळूण) चित्रफितींचे प्रकाशन नगर विकास दिनाचे औचित्य साधून करण्यात आले आहे.

तयार करण्यात आलेल्या चीत्रफितीपैकी काही चित्रफित लिंक खाली देण्यात येत आहे

- DAY-NULM Maharashtra, ULB -Yavatmal Municipal Council, Parivartan SHG & Fatima SHG PMFME Convergence – https://youtu.be/w४८eUoR०nEU
- DAY-NULM Maharashtra, ULB Bhokar Municipal Council, Dikshabhumi SHG & Sharda SHG Activity – PMFME - https://youtu.be/२MUFKjmqsAw
- DAY-NULM Maharashtra, ULB- Nagpur Corporation, Atmanirbhar SHG Story under PMFME & Skill Training - https://youtu.be/xz_EM6uKuw8
- DAY-NULM Maharashtra, ULB-Sangamner Council, Siddhakala SHG Success Story - PMFME Convergence - https://youtu.be/EfMmsiVb6wk
- DAY-NULM Maharashtra, ULB - Chandrapur Corporation, CLF Story Ward Sakhi & Divyang Dhoran - https://youtu.be/OYVqzhrTyQM
- DAY-NULM Maharashtra, ULB - Amravati Corporation, Shelter for Urban Homeless & PMSVANidhi Story - https://youtu.be/kcbMDnnkAv0
- DAY-NULM, Maharashtra, ULB-Kolhapur Corporatin, Shiv Parvati SHG Story PMFME & Durgadevi SHG Story - https://youtu.be/7i1i0UUp394
- DAY-NULM Maharashtra, ULB-Khopoli Council, Shabari & Vithai SHG, Millet Laddus & Pickles – PMFME - https://youtu.be/JspTveLb2R0
- DAY-NULM Maharashtra, ULB-Ratnagiri Council, Success Story Sonchiraiya Super Market by SHG Members - https://youtu.be/nmvKb6NLby4
- DAY-NULM Maharashtra, ULB - Thane Corporation, Pink Rickshaw - By Women SHG Members success story. - https://youtu.be/OhSgI4mRYhM

- दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत तसेच पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्यास प्राप्त पुरस्कार सं २०२३-२४

Performance Recognition for Access to financial Inclusion and Street vendors Empowerment (PRAISE) Award २०२३-२४

✓ विशेष पुरस्कार सर्वोत्कृष्ट कामगिरी (Special Award for outstanding performance) अंतर्गत प्रथम पुरस्कार महाराष्ट्र राज्यास मिळाला.

✓ पीएमस्वनिधी अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी प्रथम पुरस्कार प्राप्त शहरे:- सोलापूर महानगरपालिका व मंगळवेढा नगरपरिषद

Systematic Progressive Analytical Real Time Ranking (SPARK)

SPARK Award (२०२३-२४)

✓ अभियानांतर्गत देशपातळीवर उत्कृष्ट कामगिरी प्राप्त पुरस्कार शहरे

✓ प्रथम पुरस्कार:- पवनी नगरपरिषद

✓ द्वितीय पुरस्कार:- नागपूर महानगरपालिका, मालेगाव महानगरपालिका

✓ तृतीय पुरस्कार:- नाशिक महानगरपालिका, चंद्रपूर महानगरपालिका.

✓ Best development partner अंतर्गत तिसरा पुरस्कार:- नावीन्य शहरस्तर संघ, चंद्रपूर महानगरपालिका.

- उद्योगिनी मार्ट :

✓ DAY-NULM अभियानांतर्गत स्थापन बचत गटांद्वारे उत्पादित वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी तसेच उत्पादनांच्या विकासासाठी Team Foundation समवेत Non Financial करार करण्यात आला आहे. त्यान्वये, बचत गटांची उत्पादने Online विक्री करण्यासाठी स्वतंत्र “udyoginimart.com” या नावाने पोर्टल तयार करण्यात आले आहे.